साक्षीदार क्र **०७** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–गणेश हरिहर राय,
वय ५५ वर्ष, व्यवसाय–पो.उपनि.
राह. पोलिस स्टेशन सावनेर, तह.सावनेर, जि.नागपूर.

**<u>सरतपासणी सरकारी वकील सौ. विजया जगताप यांच्या मार्फत शपथेवर सुरू</u>**

१. सन २०२० मध्ये मी पो.स्टे.बेला येथे आउट–पोस्ट सिर्सी येथे तैनातिस होतो. दि.०१/०७/२०२० रोजी फिर्यादी सुनिता ही आउट–पोस्ट पो.चौकी सिर्सी येथे आली होती व त्यानुसार मी रिपोर्ट नोंदवुन घेतली होती. त्यानंतर गुन्हा नोंद झाला. त्यानंतर मला अप.क्र.१४८/२०२० ची तपास डायरी मला तपासाकामी मिळाली होती. सदर केस डायरीला प्रथम खबर अहवाल, तोंडी रिपोर्ट, ऑकरन्स रिपोर्ट, मेडिकल रिपोर्ट इ. होते व ते मला प्राप्त झाले होते. आता मला ऑकरन्स रिपोर्ट दाखविण्यता आला. तो माझ्या हस्ताक्षरात आहे, त्यावर माझी सही आहे त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे त्यास **नि.क्र.५१** देण्यात आला.

२. तपासामध्ये मी घटनास्थळ पंचनामा तयार केला. घटनास्थळ हे मानोली येथे होते. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला त्यावर माझी व दोन पंचांच्या सह्या आहे त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे त्यास **निशानी क्र.५२** देण्यात आला. त्यानंतर मी साक्षीदारांचे बयान नोंदविले. आरोपी अतुल अराडे व वैशाली अराडे हे आउट–पोस्ट चौकीला हजर झाल्याने त्यांच्याकडून गुन्ह्यात वापरलेला कु–हाडीचा दांडा जप्त केला. आता मला जप्तीपत्रक दाखविण्यात आला त्यावर माझी व दोन पंचांच्या सह्या आहे त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे त्यास **निशानी क्र.५३** देण्यात आला. त्यानंतर आरोपीविरूध्द सबळ पुरावा मिळून आल्याने त्यांच्याविरूध्द दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले. त्यापुर्वी मी वैद्यकिय प्रमाणपत्र व क्वेरी रिपोर्ट मिळण्यासाठी पत्रव्यवहार केला होता. आता मला नि.क्र.४८ वरिल क्वेरी रिपोर्ट मिळण्याकामी पाठविलेले पत्र दाखविण्यात आले तसेच नि.क्र. ४६ वरिल वैद्यकिय प्रमाणपत्र प्राप्त करण्याकामी पाठविलेले पत्र दाखविण्यत आले त्यावर माझ्या सह्या आहे त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यानंतर मी वैद्यकिय प्रमाणपत्र व क्वेरी रिपोर्ट हस्तगत केले त्यास यापुर्वीच नि.क्र.४६ व ४८ देण्यात आलेले आहेत.

आरोपींकडून जे शस्त्र हस्तगत केले होते ते दाखविल्यास मी ओळखतो. आता मला जी.पी. न.७२/२०२० वरिल एक लाकडी दांडा असलेली लोखंडी कु–हाड दाखविण्यात आली ती तीच आहे त्याला यापुर्वीच एम.ओ.०१ देण्यात आलेला आहे. मी आरोपींना ओळखतो. आजरोजी एक आरोपी न्यायालयात हजर आहे व दुसरा आरोपी गैरहजर आहे. हजर आरोपी तोच आहे. आरोपीच्या गैरहजेरीचा अर्ज नि.क्र.४९ वर दाखल, मंजुर, ओळखीबाबत तक्रार नाही.

**सरतपास संपला.**

**आरोपीतर्फे ॲड. आर. बी. भोंबे यांच्यातर्फे उलटतपास सुरू.**

३. सा.क्र.२ कौसाबाई हीचे बयाण मी नोंदविले होते. तिने तिचे बयाण देतेवेळी 'माझा नातु भांडण करित होता त्यावेळी आरोपीने मला टेंप्याने मारले, मला अतुल अराडे व त्याच्या बायकोने मारले होते त्यावेळी आरोपीने मला मारले व माझा नातु आदेश यालासुध्दा मारले, आरोपीने टेंप्याने मारले' इ. मजकूर सांगितला होता. आता मला सा.क्र.२ कौसाबाई हीचे बयाण दाखविण्यात आले त्यामध्ये सदर मजकूर नमुद नाही. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, वरिल बाबी कौसाबाई हीने मला बयाण देतांना सांगितल्या नव्हत्या. हे म्हणणे खरे नाही की, मी साक्षीदारांचे बयाण त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविले नाही. मी कौसाबाई हीचे बयाण दि. ३ तारखेला मानोली येथे त्यांच्या घरी घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की, तपासावेळी कौसाबाई सा.क्र.२ ही घटनास्थळावर हजर होती किंवा कसे याबाबत मी तपासच केला नाही. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, त्याबाबत तपासाची गरजच नव्हती.

४. मी फिर्यादीच्या घराच्या आजुबाजुंच्या लोकांचे बयाण नोंदविलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, ज्यावेळी मी बयाण घेण्यासाठी गेलो त्यावेळी फिर्यादीच्या घराच्या आजुबाजुचे लोक हजर नव्हते. सदर फिर्यादीच्या घराच्या अजुबाजुचे लोक मिळून न आल्यामुळे मी त्यांना बयाण नोंदविण्याकामी हजर राहण्यासाठी नोटीस दिले नव्हते. मी तपासाच्या दरम्यान जखमी सुनिता हिचा पुर्वी अपघात झाला होता किंवा कसे याबाबत विचारणा केली होती परंतु, तिने त्याबाबत सांगितले नव्हते. मला माझ्या वरिष्ठांनी सदर गुन्ह्याचा तपास करण्याकामी लेखी आदेश दिला नव्हता. आता मला नि.क्र.४६, ४८ वरिल पत्र दाखविण्यात आले त्यावर सदर पत्रव्यवहार केल्याबाबत पो.स्टे.चा जावक क्रमांक लिहीलेला नाही. पो.स्टे. ला क्वेरी रिपोर्ट आल्यानंतर त्याची नोंद पो.स्टे. मध्ये घ्यावी लागते. हे म्हणणे खरे आहे की, क्वेरी रिपोर्ट पो.स्टे. ला दाखल झाल्यानंतर ज्या नोंदी

घेतल्या त्या नोंदी अभिलेखावर दाखल केल्या नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी नि.क्र.५३ वरिल जप्तीपत्रक खोटे तयार केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळ पंचनामा खोटा बनविला. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर केसची फिर्याद नोंदविली असल्याने मी सदर गुन्ह्याचा खोटा तपास केला. हे म्हणणे खरे नाही की, मी साक्षीदारांचे बयाण खोटे नोंदविले व खोटी चार्जशिट न्यायालयात दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.सा.

समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि १९.०१.२०२६

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड